**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – पो.हे.कॉ. बाबासाहेब आबा जरे,

वय – ५४ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणूक – पोलीस मुख्यालय, अहमदनगर.

**अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.के.साबळे यांच्यामार्फत सरतपास शपथेवर सुरु–**

१. दिनांक २६.११.२०१२ रोजी मी सोनई पोलीस ठाणे येथे चालक म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी ग्रामपंचायत निवडणूक असल्याने मी खरवंडी ते तामसवाडी या रस्त्याने तामसवाडी येथे जात होतो. त्यावेळी माझ्यासोबत स.पो.नि. पाटील, पो.ना. ताके व पो.ना. ब–हाट हे होते. तेव्हा सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास खरवंडीच्या पुलाजवळ तामसवाडीकडून एक लाल रंगाचा ढंपर क्रमांक एम.एच. १२ ई.एफ. २२६६ असा येताना दिसला. त्याला आम्ही थांबवले. कर्मचा–यांनी ढंपरमध्ये काय आहे ते पाहिले. ढंपर चालकाला त्याचे नाव गाव विचारले. त्याने त्याचे नाव किशोर विष्णू टिमकरे,रा. इमामपुर, ता. नगर असे सांगितले. गाडी मालक दिलीप शिवाजी दुसुंगे, रा. कापूरवाडी असे सांगितले.

२. त्याच्या गाडीमध्ये अडीच ब्रास वाळू होती. त्याच्याकडे वाळू वाहतूक परवाना मागितला असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. तो ती वाळू भेरडापूर, ता. श्रीरामपूर येथून नगर येथे घेवून जात होता. आम्ही तो ढंपर व वाळू सोनई पोलीस स्टेशनला घेवून गेलो. पो.ना. ताके यांनी चालक व मालकाविरूध्द वाळू वाहतुकीचा परवाना नसल्याने वाळू चोरीची

फिर्याद दिली. त्यामध्ये दिनांक २६.११.२०१२ रोजी माझा जबाब नोंदवला. ढंपर चालकाला पाहिल्यास मी ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/-**

(**श्रीमती.संध्या यु. सुळ**)

दिनांक-११/०२/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, नेवासा